Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2408II04V12P0002

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(IV), Volume–XII

# शिवाजी महाराजांच्या स्वराज्य विस्तारामध्ये गिरिदुर्गांची भूमिका : एक ऐतिहासिक अध्ययन

**अमितकुमार गणेश शिंगणे**
संशोधक विद्यार्थी
एम.इ.एस. कॉलेज मेहकर,
जि. बुलढाणा.

**प्रस्तावना -**

शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली ती मावळ प्रांतातील मावळयांच्या सहकार्याने सह्याद्रीचा आश्रय घेवून गिरिदुर्गामध्ये. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीपूर्वी, मुस्लिम राजवटीत आणि मुस्लिम राज्यसत्ता अस्तित्वात येण्याच्या पूर्वीच्या काळात देखील ज्या राजसत्ता अस्तित्वात होत्या त्या राजसत्तांच्या राजधान्या म्हणजे केवळ गावं होती. त्यापैकी काही गावे ही डोंगरावर, तर काही सपाट मैदानावर होती. जसे की, बदामीच्या चालुक्यांची राजधानी डोंगराजवळ होती डोंगरावर नव्हती, पण युद्धजन्य परिस्थिती किंवा एखाद्या नैसर्गिक आपत्तीत त्या डोंगराचा आश्रय घेता यावा म्हणून त्यांनी तेथे आश्रयस्थान मात्र बांधले होते. राष्ट्रकुटांची पहिली राजधानी 'मयूरखंडी' ही नाशिक जिल्ह्यातील मार्कंडा डोंगरावर होती असे म्हणतात. राष्ट्रकुटाची दुसरी राजधानी 'मालखंड' ही मात्र मैदानात होती. त्यानंतर चालुक्यानी आपली राजधानी ‘कलपाणी’ (बिदरजवळची) सपाट मैदानावर होती. चालुक्यानंतर आलेल्या कलचुरी सत्ताधीशांनी ‘कल्याणी’ येथे आपली राजधानी ठेवली होती. त्यांचा पराभव करणाऱ्या यादवांनी आपली राजधानी ‘देवगिरी’ येथे उभारली होती. कोल्हापूरच्या शिलाहार राजानी आपली राजधानी ‘प्रणालकदुर्ग’ म्हणजे पन्हाळगडावर बसविलेली होती. मुस्लिम काळात बहमनी सुलतानांची प्रथम राजधानी ‘कलबर्गे (गुलबर्गा)’ त्यानंतर ‘बिदर’ येथे हलविण्यात आली. वरील दोन्ही शहरे सपाटीवर आहेत. बहमनी साम्राज्यानंतर महाराष्ट्र कर्नाटक प्रांतात ज्या पाच शाह्या निर्माण झाल्या, त्यामध्ये एक गोवळकोंड्याची कुतुबशाही जर सोडली, तर बहुतेक राजसत्तांच्या राजधान्या डोंगरावर स्थापन केल्या गेलेल्या दिसत नाहीत. जसे विजापूरची आदिलशाही किंवा अचलपूरची इमादशाही इतकंच नाही तर खानदेशातील फरुखी सुलतानीच्या राजधान्या ‘याळणेर’ व ‘बुऱ्हाणपूर’ या सपाट मैदानावरच होत्या; परंतु शिवाजी महाराजांनी एकामागून एक स्थापन केलेल्या दोन्ही राजधान्या ‘राजगड’ व ‘रायगड’ या सह्याद्रीच्या गिरिशिखरावर होत्या हे विशेष होय.

शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या ह्या दोन्ही राजधान्या गिरीदुर्गावर होत्या. तसेच वेळोवेळी स्वराज्यावर आलेल्या संकटाचा सामना करताना गिरीदुर्गाचा आश्रय घेतला. यावरून शिवाजी महाराजांनी केलेला स्वराज्य विस्तार पाहता त्यामधील गडकिल्ल्यांची विशेषत: गिरीदुर्गाची भूमिका लक्षात येते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य विस्तारामध्ये गिरिदुर्गांची असलेली भूमिका सविस्तर समजून घेणे हा सदर शोधनिबंधाचा मानस आहे.

**बिजाशब्द -**

गिरीदुर्ग - डोंगरावर बांधलेले किल्ले.

मावळ - दोन नद्या दरम्यानचा प्रदेश. यालाच ‘नहेर’ असे म्हणतात. (वर्तमानकाळात मावळ हा महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील एक तालुका आहे. या तालुक्यात 12 आणि जुन्नर-शिवनेरीखाली 12 अशी एकूण 24 मावळ आहे. ही 24 मावळ शिवकालीन स्वराज्यामध्ये होती.)

**उद्देश्य -**

1. भारताच्या इतिहासामध्ये गड किल्ल्यांचे महत्त्व समजून घेणे.
2. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यामध्ये गडकोटाचे, गडकिल्ल्यांचे असलेले महत्त्व अभ्यासणे.
3. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य विस्तारामध्ये गिरीदुर्गाची भूमिका जाणून घेणे.
4. तत्कालीन काळात गडकिल्ल्यांना असलेले महत्त्व आज्ञापत्रावरून जाणून घेणे.

**स्वराज्य विस्तारामध्ये गिरिदुर्गांची भूमिका -**

शिवाजी महाराजांनी जेव्हा हिंदवी स्वराज्याची स्थापना केली तेव्हा दख्खनच्या प्रदेशात राजधानी म्हणून निवड करावी असा एकही गड, कोट किंवा किल्ला म्हणावा इतका बळकट नव्हता. शिवाजी महाराजांनी आपल्या मावळयांच्या मदतीने तोरणा किल्ल्यांवर अचानक छापा टाकून तोरणा किल्ला ताब्यात घेतला. त्यावेळी तोरणा हा किल्ला आदिलशाही किल्लेदाराच्या ताब्यात होता. निजामशाहीचा अस्त झाल्यावर शहाजी राजांनी विजापूरकर आदिलशहाची चाकरी स्विकारली आणि आपल्या जवळच्या पुणे जहागिरीचा पोट मोकासा शिवाजी महाराजांना करून देऊन, मातोश्री जिजाबाई यांच्याबरोबर त्यांना पुण्याला रवाना केले होते. विजापूरकर आदिलशहानी शहाजी राजांना पुणे, इंदापूर, सुपे, बारामती वगैरे प्रांताची जहागीर जरी दिली असली तरी, त्या जहागिरीत येणारे किल्ले मात्र त्यांच्या ताब्यात दिलेले नव्हते. शहाजी राजांच्या जहागिरीतील किल्ले बादशहा या नात्याने मुहम्मद आदिलशहाच्या मनात आली असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे मुख्य राज्य राज्यसत्तेचा प्रतिनिधी जो किल्लेदार व जहागिरदार यांचा एकमेकावर अंकुश ठेवण्यासाठी आदिलशहाने ही दक्षता घेतली असावी. त्याला छेद देत शिवाजी महाराजांनी तोरणागड काबीज करून हिंदवी स्वराज्य

स्थापनेचा श्रीगणेशा केला. मरळ देशमुखांच्या कानद खोऱ्यातील उंच गिरिदुर्ग म्हणजे तोरणा. आदिलशहाचे या दुर्गाकडे पूर्णत: दुर्लक्ष झाले होते. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात तोरणा किल्ला आल्यावर त्यांनी स्वत: किल्ला फिरून पाहिला त्याची पाहणी केली; पडझड झालेल्या भागाची डागडुजी करण्याचे आदेश देऊन तोरणा किल्ल्याचा कायापालट केला. या किल्ल्याच्या तटबंदीचे काम सुरू असताना तेथे जमिनीमध्ये भरपूर धन मिळाले. ज्याचा उपयोग स्वराज्य निर्मितीसाठी, गडकोट, दुर्गाच्या डागडुजीसाठी, नवीन दुर्ग उभारणीसाठी केला.

हिंदवी स्वराज्याचा विचार मनाशी बाळगणाऱ्या शिवाजी महाराजांची महत्त्वाकांक्षी नजर मग स्थिरावली ती तोरणा किल्ल्याच्या आग्नेयेला. तोरण्यापासून अवघ्या अडीच कोसावर (सुमारे 9.5 कि.मी. वर) 'शहामृग' नावाचा एक मोठा थोरला, डोंगर होता. त्याला 'मुरुंबदेवाचा डोंगर' असेही म्हणत. खरंतर तोरणा किल्ल्यासारखाच तोही बेसावध पडलेला गिरिदुर्ग होता. मुरुंबदेवाच्या डोंगरावर हिंदवी स्वराज्याची पहिली राजधानी स्थापन करण्याचा धाडसी निर्णय शिवाजी महाराजांनी घेतला. शिवाजी महाराजांच्या आज्ञेने आबाजी सोनदेव व मोरोपंत पिंगळे यांच्या देखरेखेखाली नव्या गिरिदुर्गाचे बांधकाम सुरू झाले. एखाद्या आदर्श गिरिदुर्गाला आवश्यक असलेल्या बांधकामातील तरतुदी शिवाजी महाराजांनी त्यांना सांगितल्या. तीन दिशांना तीन भक्कम माच्या आणि त्याच्या मध्यभागी असणारा बेलाग 'बालेकिल्ला' असे त्या नव्या गडाचे स्वरूप होते. शिवाजी महाराजांनी त्याचे नाव 'राजगड' ठेवले. राजगड म्हणजे राजांचा गड अन् गडांचा राजा. वयाच्या सुमारे सतराव्या वर्षी हा धाडसी निर्णय घेऊन तो प्रत्यक्षात आणला.

इ.स. 1656 च्या सुरुवातीला शिवाजी महाराजांनी जावळीच्या चंद्रराव मोरे यांच्यावर स्वारी करून स्वराज्याची सरहद्द रुंदावली. त्यावेळी रायरी, सोनगड, चंद्रगड, मंगळगड उर्फ कांगोरीसारखे गिरिदुर्ग स्वराज्यात दाखल झाले. इतक्यावरच न थांबता त्यांनी नव्याने हाती आलेल्या जावळीच्या मुलखाच्या संरक्षणासाठी जावळीच्या अगदी जवळ पारघाटाच्या तोंडावर आणि रडतोंडी घाटाच्या नाकाडासमोर असलेल्या भोरण्याच्या डोंगराचे भौगोलिक महत्त्व जाणून तिथे नव्याने दुर्ग बांधणी सुरू केली. मोरोपंत पिंगळ्यांच्या देखरेखीत स्वराज्याचा आणखी एक गिरिदुर्ग म्हणजेच 'प्रतापगड' आकार घेऊ लागला. शिवाजी महाराजांना उदयपूरच्या महाराणा प्रतापसिंह याच्याबद्दल नितांत आदर होता; असं म्हणतात की, "जेव्हा शिवाजी महाराज औरंगजेब बादशहाच्या भेटीला आग्रा येथे जात होते तेव्हा त्यांची भेट महाराणा प्रतापसिंहाचा नातू राजसिंह याच्याशी झाली होती. भेटीच्या प्रसंगी शिवाजी महाराजांनी राजसिंहाकडे राणा प्रतापचे चित्र मागितले होते आणि त्याप्रमाणे राजसिंहाने ते त्यांना दिले. शिवाजी महाराजांपूर्वी अनेक वर्षे याच महाराणा प्रतापने मुघल बादशहा अकबराविरुध्द बंड पुकारून गनिमी काव्याने प्रबळ मुघल सैन्याला हैराण केले

होते. याशिवाय शिवाजी महाराजांनी कडतोजी गुजरला 'प्रतापराव' असा उमदा किताब दिला होता. नव्याने बांधलेल्या एका गडाला आणि आपल्या राज्याच्या सेनापतीला 'महाराणा प्रताप' याचे नाव खुद्द शिवाजी महाराजांनी द्यावे, यातूनच त्यांना महाराणा प्रतापसिंहाबद्दल वाटणारा आदर स्पष्ट होतो." याच प्रतापगडाच्या पायथ्याशी शिवसैन्याने विजापुरी फौजेची दाणादाण उडविली होती हे इतिहासात नमूद आहे. शिवाजी महाराजांवर आणि स्वराज्यावर बेतलेल्या पहिल्या मोठ्या संकटाचा मुकाबला प्रतापगडाच्या आश्रयाने केला गेला.

त्यानंतर शिवाजी महाराजांनी विजापूरच्या मुलखात मुसंडी मारून बराच मोठा मुलूख स्वराज्याला जोडला. सिद्दी जौहर उर्फ सलाबतखानाने पन्हाळगडाला जेव्हा वेढला दिला तेव्हा शिवाजी महाराजांनी विशाळगडाचा आश्रय घेतला. पन्हाळ्याच्या वेढ्यात शिवाजी महाराज अडकलेले असताना मुघल सरदार शायिस्तेखानाने स्वराज्यावर स्वतंत्र मोहीम काढली. त्यात त्याने चाकणच्या संग्राम दुर्गाला वेढा घातला. तेव्हा फिरंगोजी नरसाळा यांनी आपल्या जवळ असलेल्या मोजक्या सैन्यानिशी तब्बल 56 दिवस गड लढविला. खरं तर मुघलांचे सैन्य असंख्य अवघ्या काही तासांमध्येच गड काबीज करू शकतील येवढे तरीही फिरंगोजी नरसाळा त्यांनी आपल्या सैन्यासह चिवट प्रतिकार करीत महिना, दीड महिना शत्रूचे सैन्य रोखून धरले ही गोष्ट अतिशय महत्त्वपूर्ण, तितकीच झुंझार. चाकणचा संग्रामदुर्ग म्हणजे चौबुरुजी छोटेखानी गढीच, पण अवघ्या तीन-चारशे मावळयांनी हजारो मुघल सैन्याला छपन्न दिवस झुंजवावे याचे आजही आश्चर्य वाटते.

सन 1663 मध्ये शिवाजी महाराजांनी लाल महालात ठाण मांडून बसलेल्या शायिस्तेखानावर अचानक छापा घालून त्यांच्या मनात मराठ्याबद्दल धास्ती निर्माण केली. मिर्जा राजा जयसिंग, दिलेरखान पठाणसारखा शूरवीर जेव्हा पुरंदरला भिडले तेव्हा मुरारबाजी देशपांडेसारख्या एकनिष्ठ सेवकाने प्राणपणाला लावून मुघलांशी झुंज दिली आणि अखेरच्या श्वासापर्यंत पुरंदर किल्ल्याचे रक्षण केले. मुरारबाजीची एकाकी लढत ही त्याची स्वामिनिष्ठा, स्वराज्यनिष्ठा स्पष्ट करते. पुरंदरच्या लढाईनंतर शिवाजी महाराजांना मिर्झा राजा जयसिंहाशी तह करावा लागला आणि त्यानुसार स्वराज्यातले तेवीस किल्ले मुघलांना द्यावे लागले. इतक्यावरच हे दुष्टचक्र न थांबता शिवाजी महाराजांना युवराज संभाजी राजांसह आग्र्याला जावे लागले. तिथे त्यांच्यावर नजरकैदेचा प्रसंग ओढविला, त्या परिस्थितीवर देखील मात करून शिवाजी महाराजांनी स्वत:ची आणि आपल्या सहकाऱ्याची सुटका करून घेतली. स्वराज्यात परत आल्यावर शिवाजी महाराजांनी पुरंदरच्या तहानुसार मुघलांना जे तेवीस किल्ले व मुलूख दिला होता, तो परत जिंकून घेण्यासाठी नवीन मोहीम आखली गेली. त्या मोहिमेचा श्रीगणेशा 'कोंढाणा (सिंहगड)' घेऊन झाला. हजारोंच्या सैन्याला हल्ला करूनही जे साध्य

झाले नाही ते नरवीर तानाजी मालुसरेने अवघ्या पाचशे मावळयांसह करून दाखवले आणि शेवटच्या स्पंदापर्यंत स्वामिनिष्ठा मनात बाळगली.

सिंहगडानंतर कोंडाजी फर्जंदने अवघ्या साठ मावळयांच्या मदतीने पन्हाळगडासारखा आडवा विस्तार असलेला महत्त्वाचा गड घ्यावा आणि तोही एका छाप्यात! ज्या सिद्दी जौहरला 50,000 सैन्याचा वेढा घालूनही जे कार्य जमले नाही, ते कोंडाजी फर्जंदने अवघ्या 60 मावळयांच्या मदतीने केले. उत्तर कोकणातील माहुलीचा किल्ला चिवटपणे झुंजवणारा मुघल किल्लेदार मनोहरदास गौड त्याची तारांबळ उडवून देणारे शिवसैन्य आणि किल्लेदाराच्या बदलीमुळे उपलब्ध झालेल्या संधीचा अचूक फायदा उठवणारे शिवाजी महाराज आणि त्यांचे एकनिष्ठ मावळे या सर्वांच्या शौर्याची, गाथा एका गिरिदुर्गाशी निगडित आहे. कोकणातल्या धो-धो कोसळणाऱ्या पावसात कर्नाळयासारख्या वनदुर्गाला वेढा घालून आणि प्रसंगी लाकडाच्या फळयांवर चिखल थापून संरक्षक भिंती पुढे करून शत्रूचा मारा अडवत तटाला बिलगणारे शिवाजी महाराजांचे अनामिक सैन्य हे तुलनेच्या पलीकडचे म्हणावे लागेल. शिवाजी महाराजांची हीच खरी संपत्ती होती.

**आज्ञापत्रातील गडकोटाचे महत्त्व -**

सामान्यातल्या सामान्य माणसामधील असामान्य गुण हेरून, त्याप्रमाणे त्याच्यावर कामगिरी सोपवून त्याच्याकडून असामान्य कामगिरी करून घेणारे शिवाजी महाराज हे थोर आहे. त्यांची महानता शब्दांच्या पलीकडची आहे. अमात्य रामचंद्र बावडेकर यांनी आपल्या आज्ञापत्रात शिवाजी महाराजांच्या स्वराज्य - निर्मितीच्या कार्यातील गड, कोट व दुर्गाचे महत्त्व सांगताना नमूद करतात की, "संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रजाभग्न होऊन उद्ध्वस्त होतो. देश उद्ध्वस्त झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे? याकरिता पूर्वी जे-जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो-तो देश शाश्वत करून घेतला आणि आले परचक्रसंकट दुर्गाश्रची परिहार केले. हे राज्य तर तीर्थस्वरूप थोरले कैलासवासी स्वामी (शिवाजी महाराज) यांनी गडावरूनच निर्माण केले. जो-जो देश स्वशासन न होय त्या-त्या देशी स्थलविशेष पाहून गड बांधिले. तसेच जलदुर्ग बांधिले; त्यावरून आक्रमण करीत-करीत झालेली अरिकंतापासून कावेरीतीरापर्यंत निष्कंटक राज्य संपविले. औरंगजेबासारखा महाशत्रू चालून येऊन विजापूर भागानगर (गोवळकोंडा) सारखी महासंस्थाने आक्रमिली, संपूर्ण तीस बत्तीस वर्षेपर्यंत या राज्यांशी आणि (अतिशय) श्रम केला, त्याचे यत्नास असाध्य काय होते? परंतु राज्यात किल्ले होते म्हणून अविशिष्ट तरी राज्य राहिले. पुढे पूर्णवत करावयास आवकाश जाहला. ज्यापेक्षा राज्य संरक्षण करणे आहे, त्यापेक्षा अधिकोत्तर साधनी स्वतः गड किल्ल्यांची उपेक्षा न करिता, परम सावधपणे असतील त्या गडकिल्ल्यांची यथायोग्य मजबुदी करावी. नूतन देश साधणे त्या देशात जी स्थळे असतील ती महत प्रयत्ने हस्त (हस्तगत) करावी. ज्या देशात गडकोट नसतील त्या

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2408II04V12P0002

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(IV), Volume–XII

देशात आपले राज्याचे सरदे (सरहद्दी) पासून पुढे जबरदस्तीने नूतन स्थळे बांधीत-बांधीत तो देश आक्रमावा. त्या स्थळांचे आश्रयी सेना ठेवून पुढील देश स्वशासन करावा. असे करीत-करीत राज्य वाढवावे. गडकोटाचा आश्रय नसता फौजेच्याने परमुलखी टिकात धरून राहवत नाही. फौजेविरहीत परमुलखी प्रवेश होणेच नाही. इतक्याचे कारण ते गडकोट विरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. याकरिता ज्या राज्यात गडकोट न दिसती त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्यांनी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण असे पूर्ण चित्तात आणून कोणाचे भरवशावर न राहता, आहे त्याचे संरक्षण करणे, नूतन किल्ला बांधण्याचा हव्यास स्वत:च करावा. कोणाचा विश्वास मानू नये." अशा शब्दामध्ये अमात्य रामचंद्र बावडेकर यांनी आपल्या आज्ञापत्रात गडकोट गडकिल्ल्यांचे महत्त्व स्पष्ट केलेले आहे.

**निष्कर्ष -**

1. शिवाजी महाराजांच्या साम्राज्य विस्ताराचे अध्ययन केल्यास 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग' या गडकिल्ल्यांच्या महतीची सत्यता पाहायला दिसून येते.
2. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य विस्तारामध्ये गिरीदुर्गाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे.
3. शिवाजी महाराजांनी स्वराज्यामध्ये बरेच किल्ले शत्रूकडून जिंकले आणि त्यापेक्षा जास्त किल्ल्यांची डागडुजी करून नवीन किल्ल्याची निर्मिती केली.
4. किल्ल्याच्या विस्तारासोबतच स्वराज्याचा विस्तार झपाटाने होऊन स्वराज्याला बळकटी मिळाली.
5. स्वराज्यातील बळकट किल्ल्यामुळे स्वराज्यावर प्रत्येक वेळी येणाऱ्या संकटांना प्रतिकार करण्याची क्षमता मराठ्यामध्ये निर्माण झाली.
6. स्वराज्यावर आलेल्या प्रत्येक संकट प्रसंगी शिवाजी महाराजांनी गडकिल्ल्यांचा भक्कम आधार घेतला.
7. स्वराज्यातील एकेक किल्ला कित्येक महिने, वर्ष लढविला जात होता तशा प्रकारची व्यवस्था, शिबंदी गडकिल्ल्यावर निर्माण केलेली होती. ज्यामुळे स्वराज्यातील कुठलाही भाग, कुठलाही गडकोट, गडकिल्ला शत्रूला हस्तगत करता आला नाही.
8. एकंदरीत शिवाजी महाराजांच्या स्वराज्य विस्तारामध्ये गडकिल्ल्यांची विशेषतः गिरीदुर्गाची भूमिका अनन्यसाधारण, अविस्मरणीय असल्याचे दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ सूची -**

1. आचार्य, धनंजय - मराठा सत्तेचा उदय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर,

2. खोले, विलास (संपा.) - आज्ञापत्र, लोकवाङ्मय प्रकाशन, पुणे, 2007.
3. जोशी. शं.ना. - अर्वाचीन महाराष्ट्रेतिहास काळातील राज्यकारभाराचा अभ्यास, भाग 1, पुणे, 1959.
4. दांडेकर, गोपाळ निळकंठ - महाराष्ट्र दर्शन, मृण्मयी प्रकाशन, पुणे, 2001.
5. देशमुख, विजय - महाराजांच्या मुलुखात, वैशाली प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, ऑक्टोबर 1976.
6. सावंत, बी.एस. ; जाधव, व्ही.के. - मराठ्यांचा प्रशासकीय आणि सामाजिक आर्थिक इतिहास, प्रथमावृत्ती, विद्या प्रकाशन, नागपूर, 1997.